| MHLA120015872015 | निशाणी क्रमांक ७५ वरील आदेश |
|---|---|

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० सहकलम १५१ प्रमाणे श्री.राजकुमार रामराव उडदे व संदीप विजयकुमार उडदे यांना दाव्यात वादी म्हणून सामील करून घेण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार असे कथन करतात की, प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकतीवर प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढून त्याचा प्रत्यक्ष ताबा देण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र.३ फुलाबाई बाबुराव उडदे या मयत झाल्या असुन वाद मिळकतीपैकी त्यांच्या नावे असलेली ०० हे ६२ आर ही जमीन वारसाआधारे त्यांची मुले बालाजी बाबुराव उडदे व विजयकुमार बाबुराव उडदे यांच्या नावावर आलेली होती. त्यानंतर त्यांनी सदर जमिनीचे आपसात वाटप करुन घेतल्यामुळे बालाजी यांना वाद मिळकतीपैकी ०० हे ४२ आर तर विजयकुमार यांना ०० हे २२ आर जमीन हिश्सास आलेली होती. त्यापैकी बालाजी यांनी त्यांच्या हिश्यास आलेली संपुर्ण जमीन ०० हे ४२ आर ही राजकुमार रामराव उडदे यांना अनुक्रमे खरेदीखत दस्त क्र.७९६/२०१६ व १३१६/२०२४ दि.२७/०७/२०१६ व १९/१२/२०२४ रोजी कायम विक्री केल्यामुळे राजकुमार रामराव उडदे यांच्या नावाचा फेर मंजुर होऊन ७/१२ उताऱ्यावर अंमल घेण्यात आला आहे. तसेच विजयकुमार बाबुराव उडदे यांनी त्यांचा मुलगा संदीप याच्या नावे ०० हे २० आर जमीन केलेली आहे. त्यामुळे संदिप विजयकुमार उडदे यांच्या नावे फेरफार मंजूर होऊन त्यांच्या नावाचा ७/१२ उताऱ्यावर अंमल घेण्यात आला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये राजकुमार रामराव उडदे व संदीप विजयकुमार उडदे यांना वादी क्र.३ यांच्या नावे असलेली जमीन राजकुमार व संदीप यांच्या हक्कात समाविष्ट झालेली आहे. त्यामुळे सदर व्यक्तींना प्रस्तुतच्या दाव्यात वादी म्हणून समाविष्ट करणे हे

दाव्याच्या अंतिम निर्णयाकरीता आवश्यक आहे. तसेच त्यांना दाव्यात समाविष्ट केल्यास प्रतिवादींचे कसल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही व त्यांच्या हक्कावर कसल्याही प्रकारची बाधा उत्पन्न होणार नाही अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादींनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास सक्त हरकत नोंदवली आहे. सदरचा अर्ज नामंजुर करणेस पात्र आहे. सदर वादी म्हणत असल्याप्रमाणे वादी क्र.३ मयत झालेली आहे. त्याबाबत तजवीज केलेली नाही. तसेच सदरचा दावा ताबा मिळणेकामी केलेला आहे. वादी म्हणून ज्या व्यक्तींना समाविष्ट करावयाचे आहे त्यांनी जमीन खरेदी घेतलेली व वारसा आधारे आलेली आहे असे नमुद केलेले आहे. त्याबाबतचा पुरावा दिला नाही. तसेच त्याचा फेरफार, ७/१२ उतारा दिलेला नाही तरी ते खरेदीखताआधारे जमीन अंमल त्याच्या ताब्यात जमीन असल्याशिवाय खरेदीखत होऊ शकत नाही. तसेच ज्यांना वादी करावयाचे आहे ते स्वःत हजर नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी करतात.

०४. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे व अभिलेख यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतचा ताबा अतिक्रण दुर करुन ताबा परत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टर्थ प्रतिज्ञापत्र नि.क्र.७६ वर दाखल केलेले आहे. वादीने यापुर्वीच नि.क्र.८३ च्या आदेशान्व्ये वादी क्र.३ च्या वारसांना दाव्यात समाविष्ट केलेले आहे. तसेच वादीने सर्वे नंबर ३०/८५ च्या नवीन सात बारा उताऱ्याची प्रत नि.क्र.७९ कडे दाखल केलेली आहे. त्यावर राजकुमार रामराव उडदे व संदीप विजयकुमार उडदे यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीत दिसन येते. त्यामुळे दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयाकरीता वर नमुद दोन्ही पक्षकार हे आवश्यक पक्षकार आहेत असे दिसुन येते. प्रतिवादींनी हरकत घेतली आहे. परंतु त्यांना पक्षकार का

करण्यात येऊ नये याचे कारण नमुद केले नाही. अर्जातील कथने, नमुद कारणे व दाव्याचे स्वरुप पाहता वर नमुद राजकुमार रामराव उडदे व संदीप विजयकुमार उडदे यांना वादी म्हणून समाविष्ट करणे हे दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे, अशा निष्कर्षापर्यंत येत आहे. तसेच त्यांच्या हजेरी व्यतिरीक्त दाव्याचा निकाल देणे उचित ठरणार नाही, असे मत नोंदवून अर्जदाराचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे असे मत नोंदवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज (निशाणी क्र.७५) खर्च रक्कम रु.५००/– मंजूर करण्यात येतो. |
| ०२. | अर्जदार यांनी दाव्यात राजकुमार रामराव उडदे व संदीप विजयकुमार उडदे यांचे नाव वादी म्हणून समाविष्ट करुन आवश्यक ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.11.29 11:06:06 +0530

निलंगा
दि.२८/११/२०२५

(श्रीमती. के.पी.गाडे )
२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर
निलंगा